# अधिसूचना

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १४ ऑगस्ट, २००३.

**महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९.**

क्रमांक-युडब्ल्युए-१४२००२/(९६/६)/कामगार-५

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९, (महाराष्ट्र १९६९ चा ३०) (यात यानंतर ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) च्या कलम ४ चे पोट कलम (१) व (२) च्या परंतुक क्र. २ च्या कलम (ए) आणि मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४, (१९०४ चा मुंबई १) च्या कलम २४ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा व त्यासंबंधात त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आणि सल्लागार समितीबरोबर विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र शासन याद्वारे धुळे किराणा बाजार आणि दुकाने व बाजार, दुय्यम बाजार आणि सार्वजनिक माल वहातूक वाहन असंरक्षित, कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, १९८९, मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील योजना प्रकाशित करीत आहे. ही योजना उक्त अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रकाशित करण्यात आली आहे.

# योजना

**क्र.युडब्ल्युए-१४२००२/(९६/६)/कामगार-५ :-** ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने धुळे किराणा बाजार किंवा दुकाने व बाजार, दुय्यम बाजार आणि सार्वजनिक माल वाहन असंरक्षित कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, १९८९ (यात यानंतर जिचा निर्देश "उक्त योजना" असा करण्यात आलेला आहे,) मध्ये दिनाक १२.१.१९८९ च्या शासन अधिसूचना, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, क्र: युडब्ल्यूए-१४८३/१०३७८(१)/कामगार-५ द्वारे धुळे जिल्हयांसाठी प्रकाशित केली असून उक्त योजनेमध्ये नमूद केलेल्या अनुसूचित नोक-यासाठी लागू केलेली आहे,

आणि ज्याअर्थी, सल्लागार समिती बरोबर विचारविनिमय केल्यानंतर सदर योजनेत खालील अनुसूचित रोजगारांचा समावेश करणे आणि ही योजना धुळे आणि नंदूरबार जिल्हयांमधील सर्व क्षेत्रांना लागू करावी असे महाराष्ट्र शासनास आवश्यक वाटत आहे,

(१) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील लोखंड व पोलाद बाजार किंवा दुकाने यातील नोकरी.

(२) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे (भरणे, शिवणे, पृथःकरण करणे, स्वच्छ करणे) किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील या अनुसूचीच्या इतर कोणत्याही नोंदीखाली न येणारी, बाजारातील आणि कारखान्यातील व इतर आस्थापनातील नोकरी.

(३) रेल्वे प्राधिकरणाकडून जे कामावर ठेवण्यात आले नसतील अशा कामगारांकडून करण्यात येणारी माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील रेल्वे आवारातील किंवा गुडस् शेडमधील नोकरी.

(४) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे (भरणे, शिवणे, पृथःकरण करणे, स्वच्छ करणे) किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन त्यासंबंधातील भाजीपाला बाजारातील (कांदे व बटाटा बाजार धरुन ) नोकरी.

(५) खोकी तयार करण्याच्या कामातील किंवा इमारती लाकूड बाजारातील नोकरी.

(६) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे (भरणे, शिवणे, पृथःकरण करणे, स्वच्छ करणे) किंवा अशा प्रकारच्या इतर कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील कापड धागा व कापूस बाजार किंवा दुकाने यातील नोकरी.

(७) अन्नधान्याच्या गोदामात माल भरणे, तो उतरविणे आणि त्याची ने-आण करणे (अन्नधान्याचे पृथ:करण करणे व ते स्वच्छ करणे, पोत्यात अन्नधान्य भरणे, आणि अशी पोती शिवणे) किंवा अशा प्रकारच्या कामांशी अनुषंगिक व संबंधित असेल अशी नोकरी.

(८) कांदे स्वच्छ करणे, त्यांचे पृथ:करण करणे, ते उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे, ते पोत्यात भरणे व पोती शिवणे आणि अशा प्रकारच्या, कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील नोकरी.

त्यामुळे महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ (महाराष्ट्र १९६९ चा ३०) च्या कलम ४ चे पोट कलम (१) व (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा व मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ चा (१९०४ चा मुंबई-१) चे कलम-२४ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा व त्यासंबंधीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आणि सल्लागार समितीबरोबर विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त योजनेला सुधारणा करण्यासाठी खालील योजना तयार करीत आहे.

१. या योजनेस धुळे आणि नंदूरबार जिल्हा माथाडी, हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारित) योजना २००३ म्हणावे.

२. धुळे किराणा बाजार किंवा दुकाने व बाजार, दुय्यम बाजार आणि सार्वजनिक माल वहातूक वाहन असंरक्षित कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना १९८९ (यानंतर जिचा उल्लेख "उक्त योजना" असा करण्यात येईल) च्या कलम १ ऐवजी खालील कलम १ म्हणून घालण्यात येईल :-

"१. नांव:- या योजनेला धुळे आणि नंदूरबार जिल्हा माथाडी, हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारित) योजना २००३ असे म्हणावे.

३. उक्त योजनतील खंड २ मध्ये,--

(अ) उपखंड (१) (सी) नंतर खालील उपखंड अंतर्भूत करण्यात यावेत:-

(डी) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे किंवा अशा कामंच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील लोखंड व पोलाद बाजार किंवा दुकाने यातील नोकरी.

(इ) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे (भरणे, शिवणे, पृथ:करण करणे, स्वच्छ करणे) किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील या

अनुसूचीच्या इतर कोणत्याही नोंदीखाली न येणारी, बाजारातील आणि कारखान्यातील व इतर आस्थापनातील नोकरी.

(एफ) रेल्वे प्राधिकरणाकडून जे कामावर ठेवण्यात आले नसतील अशा कामगारांकडून करण्यात येणारी, माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्यांचे वजन व मापन करणे किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील रेल्वे आवारातील किंवा गुडस शेडमधील नोकरी.

(जी) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे (भरणे, शिवणे, पृथःकरण करणे, स्वच्छ करणे) किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन त्यासंबंधातील भाजीपाला बाजारातील (कांदे व बटाटा बाजार धरुन) नोकरी.

(एच) खोकी तयार करण्याच्या कामातील किंवा इमारती लाकूड बाजारातील नोकरी.

(आय) माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे (भरणे, शिवणे, पृथःकरण करणे, स्वच्छ करणे) किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील कापड धागा व कापूस बाजार किंवा दुकाने यातील नोकरी.

(जे) अन्नधान्याच्या गोदामात माल भरणे, तो उतरविणे आणि त्याची ने-आण करणे (अन्नधान्याचे पृथःकरण करणे व ते स्वच्छ करणे, पोत्यात अन्नधान्य भरणे, आणि अशी पोती शिवणे) किंवा अशा प्रकारच्या कामांशी अनुषंगिक व संबंधित असेल अशी नोकरी.

(के) कांदे स्वच्छ करणे, त्यांचे पृथःकरण करणे, ते उतरविणे, त्यांची ने-आण करणे, त्यांचे वजन व मापन करणे, ते पोत्यात भरणे व पोती शिवणे आणि अशा प्रकारच्या कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील नोकरी.

**(ब) खंड (२) च्या उपखंड (२) ऐवजी खालील खंड अंतर्भूत करण्यात यावे:-**

**(२) प्रयुक्ती:-** ही योजना धुळे व नंदूरबार जिल्हयांच्या क्षेत्रातील नोंदणीकृत कामगार आणि नोंदणीकृत मालक यांना यासोबत जोडलेल्या अनुसूचीतील स्तंभ क्र.४ आणि ५ मध्ये त्या - त्या नोंदीसमोर दर्शविलेल्या विहीत दिनांकापासून अनुसूचीतील स्तंभ क्र.२ मध्ये विहित अनुसूचित रोजगारांमधील कामगार आणि मालक यांना त्यांच्यापुढे सदर अनुसूचीतील स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या क्षेत्रांमध्ये ही योजना लागू होईल किंवा लागू झाली असे समजण्यात येईल.

४ उक्त योजनेच्या खंड ४ मधील उपखंड (बी) मध्ये धुळे या शब्दानंतर व नंदूरबार जिल्हा या शब्दांचा समावेश करण्यात येईल.

५) **उक्त योजनेच्या खंड १४ ऐवजी खालील खंड १४ म्हणून अंतर्भूत करण्यात यावा:**

१४ मालकांची नोंदणी :- प्रत्येक मालक की, ज्यामध्ये मुकादम, कमिशन अडत्या, लॉरी पुरवठादार, वटवणे अडत्या, खरेदीदार, आयातदार, निर्यातदार यांचा समावेश असेल, की जो यासोबत जोडलेल्या अनुसूचितील अनुसूचित रोजगारांमध्ये माल प्राप्त करणे, रचणे, माल भरणे, उतरवणे, त्याची ने-आण करणे, पाठविणे, विक्री करणे, खरेदी करणे, किंवा व्यापार करणे किंवा दलाल म्हणून काम करणे अशा प्रकारच्या कोणत्याही कामात गुंतलेला असेल व सदर अनुसूचित विहित केलेल्या व ही योजना लागू असलेल्या क्षेत्रामध्ये धुळे आणि नंदूरबार जिल्हा माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) (सुधारित) योजना, २००३ लागू झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या कालावधीत किंवा त्यांनी व्यवसायास सुरुवात केल्याच्या दिनांकापासून, यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापासून सदर योजनेसोबत जोडलेले नमुनापत्र-ए मध्ये अर्ज करुन मंडळाकडे नोंदणी करावी.

६ उक्त योजनेच्या खंड १५ ऐवजी खालील खंड १५ म्हणून अंतर्भूत करण्यात यावे

१५ विद्यमान आणि नवीन कामगारांची नोंदणी:

(१) यासोबत जोडलेल्या अनुसूचित उल्लेखिलेल्या कोणत्याही रोजगारांमध्ये काम करणा-या कामगाराने, त्या रोजगारांसमोर दर्शविलेल्या विहीत दिनांकास, या योजने अन्वये नोंदित व्हावे. अन्य कोणताही कामगार जो उक्त अनुसूचित रोजगारांमध्ये मंडळाने यासंदर्भात विहीत केलेल्या अथवा उक्त मंडळ विहित करेल अशा दिनांकास काम करीत असल्यास , जर तो भारताचा नागरिक असेल आणि स्थानिक परिस्थितीत शारिरिक पात्रता किंवा अनुभव यांचा मंडळाने विहित मुदतीत विचार करुन मंडळाने विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या गुणवत्तांचे धारण करीत असेल आणि त्याचे वय ६० वर्षापेक्षा जास्त नसेल आणि जो आरोग्यदृष्टया अपात्र नसेल तर त्याची नोंदणी करण्यात यावी.

(२) या योजनेत कुठेही कोणत्याही तरतुदीमध्ये उल्लेख नसलेल्या, तथापि ज्या ठिकाणी मंडळाचे असे मत झाले असेल की, जर एखादया कामगाराने त्याच्या अर्जामध्ये खोटी माहिती देवून किंवा तिथे आवश्यक असलेली कोणतीही माहिती लपवून नोंदणी केलेली आहे किंवा जिथे कामगारांची नोंदणी अयोग्यरित्या किंवा चुकीच्या पध्दतीने झाली आहे, तर मंडळ त्याचे नांव नोंदवहीतून काढून टाकण्याबाबत सूचना देईल. तथापि, अशा प्रकारची कोणतीही सूचना देण्यापूर्वी, अशा प्रकारच्या प्रस्तावित सूचना का निर्गमित करण्यात येवू नयेत याची कारणे दाखविण्याबाबतची संधी मंडळ अशा प्रकारच्या कामगाराला देईल.

७) खंड ४३ आणि उक्त योजनेच्या अर्ज एक नंतर, खालील अनुसूचि अंतर्भूत करण्यात यावी:

अनुसूचि
(खंड २(२) पहावे)

| अ.क्र. | रोजगाराचे नांव | कोणत्या क्षेत्रात लागू आहे. | योजनेची कलमे १४ व १५ लागू होण्याचा दिनांक. | योजनेतील उर्वरित कलमे लागू होण्याचा दिनांक. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे, भरणे, शिवणे, पृथःक्करण करणे, स्वच्छ करणे किंवा अशा प्रकारच्या इतर कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातातील किराणा बाजार किंवा दुकाने यातील नोकरी. | अ) धुळे जिल्हयातील धुळे, दोंडाईचा आणि नंदूरबार नगरपालिकांची हद्द.<br>ब) वर अ) येथे उल्लेखिलेली क्षेत्रे वगळता धुळे जिल्हा आणि नंदुरबार जिल्हा यांतील उर्वरित सर्व क्षेत्रे. | अ) १ फेब्रुवारी १९८९.<br>ब) ही अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिध्द होऊन अंमलात आलेल्या दिनांकापासून. | अ) १५ फेब्रूवारी,१९८९.<br>ब) ही अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिध्द होऊन अंमलात आलेल्या दिनांकापासून. |
| २ | माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व (मापन करणे, भरणे, शिवणे, पृथःक्करण करणे, स्वच्छ करणे किंवा अशा प्रकारची इतर कामे) किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधात, महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम , १९६३ अन्वये स्थापन | --"-- | --"-- | --"-- |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| | कारण्यात आलेल्या बाजारातील किंवा दुय्यम बाजारातील नोकरी. | | | |
| ३ | सार्वजनिक वाहतुकीच्या वाहनात माल भरणे किंवा त्यामधून तो उतरविणे व त्या कामाशी अनुषंगिक व संबंधित असेल असे इतर कोणतेही काम. यासंबंधातील नोकरी. | अ) धुळे जिल्हयातील धुळे, दोंडाईचा आणि नंदूरबार नगरपालिकांची हद्द.<br>ब) वर अ) येथे उल्लेखिलेली क्षेत्रे वगळता धुळे जिल्हा आणि नंदुरबार जिल्हा यांतील उर्वरित सर्व क्षेत्रे. | अ) १ फेब्रुवारी १९८९<br>ब) ही अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिध्द होऊन अंमलात आलेल्या दिनांकापासून. | अ) ०५ फेब्रुवारी, १९८९<br>ब) ही अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिध्द होऊन अंमलात आलेल्या दिनांकापासून. |
| ४ | माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे अशा प्रकारचे कोणतेही काम किंवा अशा प्रकारच्या कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामसंबंधातातील लोखंड व पोलाद बाजार किंवा दुकाने यातील नोकरी. | संपूर्ण धुळे जिल्हा व संपूर्ण नंदूरबार जिल्हा. | शासकीय राजपत्रामध्ये योजनेची अधिसूचना अंतिमरित्या प्रकाशित होऊन अंमलात आलेल्या दिनांकापासून. | शासकीय राजपत्रामध्ये योजनेची अधिसूचना अंतिमरित्या प्रकाशित होऊन अंमलात आलेल्या दिनांकापासून. |
| ५ | माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे, (वळवणे व कापणे, भरणे, शिवणे, पृथःक्करण करणे, स्वच्छ करणे किंवा अशा प्रकारची इतर कामे) किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक | --"-- | --"-- | --"-- |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| | कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातातील या अनुसूचीच्या इतर कोणत्याही नोंदीखाली न येणारी, बाजारातील आणि कारखान्यांतील व इतर आस्थापनांतील नोकरी. | | | |
| ६ | रेल्वे प्राधिकरणाकडून जे कामावर ठेवण्यात आले नसतील अशा कामगारांकडून करण्यात येणारी माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे किंवा अशा प्रकारची इतर कामे किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातातील रेल्वे आवारातील किंवा गुडस् शेडमधील नोकरी. | संपूर्ण धुळे जिल्हा व संपूर्ण नंदूरबार जिल्हा. | शासकीय राजपत्रामध्ये योजनेची अधिसूचना अंतिमरित्या प्रकाशित होऊन अंमलात आलेल्या दिनांकापासून. | शासकीय राजपत्रामध्ये योजनेची अधिसूचना अंतिमरित्या प्रकाशित होऊन अंमलात आलेल्या दिनांकापासून. |
| ७ | माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्यांची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे (भरणे, शिवणे, पृथःक्करण करणे, स्वच्छ करणे किंवा अशा प्रकारची इतर कामे), किंवा अशा कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन त्यासंबंधातील भाजीपाला बाजारातील (कांदे व बटाटा बाजार धरुन) नोकरी. | --"-- | --"-- | --"-- |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ८ | खोकी तयार करण्याच्या कामातील किंवा इमारती लाकूड बाजारातील नोकरी. | संपूर्ण धुळे जिल्हा व संपूर्ण नंदूरबार जिल्हा. | शासकीय राजपत्रामध्ये योजनेची अधिसूचना अंतिमरित्या प्रकाशित होऊन अंमलात आलेल्या दिनांकापासून. | शासकीय राजपत्रामध्ये योजनेची अधिसूचना अंतिमरित्या प्रकाशित होऊन अंमलात आलेल्या दिनांकापासून. |
| ९ | माल भरणे, तो उतरविणे, रचणे, त्याची ने-आण करणे, त्याचे वजन व मापन करणे, (भरणे, शिवणे, पृथ:क्करण करणे, स्वच्छ करणे किंवा अशा प्रकारची इतर कामे किंवा) अशा प्रकारच्या इतर कामांच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामासंबंधातील कापड व कापूस बाजार किंवा दुकाने यातील नोकरी. | --"-- | --"-- | --"-- |
| १० | अन्नधान्याच्या गोदामात माल भरणे, तो उतरविणे आणि त्याची ने-आण करणे (अन्नधान्याचे पृथक्करण करणे व ते स्वच्छ करणे, पोत्यात अन्नधान्य भरणे आणि अशी पोती शिवणे) किंवा अशा प्रकारच्या कामांशी अनुषंगिक व संबंधित असेल अशी नोकरी. | --"-- | --"-- | --"-- |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ११ | कांदे स्वच्छ करणे, त्यांचे पृथक्करण करणे, ते चढविणे, उतरविणे, रचणे, ने-आण करणे, त्यांचे वजन करणे, ते पोत्यात भरणे व पोती शिवणे आणि अशा प्रकारच्या पूर्वतयारीची किंवा अनुषंगिक कामे धरुन अशा प्रकारच्या इतर कामांसंबंधातील नोकरी. | संपूर्ण धुळे जिल्हा व संपूर्ण नंदूरबार जिल्हा. | शासकीय राजपत्राम्ध्ये योजनेची अधिसूचना अंतिमरित्या प्रकाशित होऊन अंमलात आलेल्या दिनांकापासून. | शासकीय राजपत्रामध्ये योजनेची अधिसूचना अंतिमरित्या प्रकाशित होऊन अंमलात आलेल्या दिनांकापासून. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(पं.खं.जाधव)
कार्यासन अधिकारी.

महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्र भाग- एक - ल, दिनांक १४–८–०३ मध्ये प्रकाशित करण्यासाठी व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई यांच्याकडे रवाना: संदर अधिसूचनेचा इंग्रजी अनुवाद सोबत जोडला असून, तो यासोबत प्रकाशित करावा.

अधिसूचनेचे प्रकाशन असाधारण राजपत्रात करण्यास उपसचिव (कामगार), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांनी मान्यता दिली आहे.

मुद्रिताच्या ५० प्रती या विभागास पाठविण्यात व्याव्यात.

(पं.खं.जाधव)
कार्यासन अधिकारी.

प्रत माहितीसाठी :-

कामगार आयुक्त, मुंबई.
अध्यक्ष तथा, सहाय्यक/उप कामगार आयुक्त, माथाडी मंडळ, धुळे जिल्हा.
कामगार कक्षातील सर्व सह / उप / अवर सचिव व कक्ष अधिकारी
प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक
उप सचिव (श्रीमती प्रभु) यांचे स्वीय सहाय्यक
निवडनस्ती (कामगार-५)